SAMPLE CONTENT

Perfect

# मराठी बालभारती




इयत्ता सहावी

(मराठी माध्यम)

प्राची शेंडे
M.Com., C.A.

सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.

Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्वारे नियोजित अभ्यासक्रमावर आधारित.

PERFECT

# मराठी बालभारती

## इयत्ता सहावी (मराठी माध्यम)

### ठळक वैशिष्ट्ये

- प्रभावी संकल्पनांच्या उभारणीकरता सहाय्यभूत.
- प्रश्नांचे संकलित व आकारिक मूल्यमापनानुसार विभाजन.
- स्वाध्यायातील सर्व प्रश्नांचा सुयोग्य उत्तरांसहित समावेश.
- सरावासाठी अधिक प्रश्न समाविष्ट.
- स्वतंत्र व्याकरण विभाग अंतर्भूत.
- स्वतंत्र लेखन विभाग अंतर्भूत.

Sample Content

Printed at: **India Printing Works,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022 **TEID: 2212** P.O. No. 3057

# प्रस्तावना

नमस्कार,

शिक्षण मंडळाने विकसित केलेला इयत्ता सहावी 'मराठी बालभारती'चा अभ्यासक्रम फार कल्पक व मुलांच्या संकल्पना अधिक स्पष्ट करणारा आहे. या अभ्यासक्रमावर आधारित **टार्गेट प्रकाशनाचे Perfect मराठी बालभारती इयत्ता सहावी** हे पुस्तक मुलांच्या हाती देताना आम्हांला आनंद होत आहे.

या पुस्तकात प्रत्येक पाठाची ओळख व्हावी, म्हणून पाठाच्या सुरुवातीला 'पाठाचा परिचय' तर प्रत्येक कविता व्यवस्थित समजून घेता यावी यासाठी कवितेच्या सुरुवातीला 'कवितेचा भावार्थ' देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना सर्व पाठांचे आणि कवितांचे आकलन करून घेणे सहज सोपे व्हावे, म्हणून त्यांतील जास्तीत जास्त शब्द, वाक्प्रचार व टिपा यांचा अर्थासहित समावेश करण्यात आला आहे.

पाठाच्या मांडणीच्या क्रमानुसार प्रश्नांची मांडणी हे टार्गेटच्या पुस्तकांचे वेगळेपण आहे. त्यामुळे, प्रत्येक प्रश्नाचा क्रम पाठाच्या मांडणीच्या क्रमानुसार ठेवलेला आहे. जेणेकरून, प्रश्न सोडवताना पाठातील घटनाक्रम पुन्हा एकवार स्पष्ट होऊन विषयाचे ज्ञान पक्के होते.

सर्व पाठांखालील प्रश्नांची संकलित मूल्यमापन व आकारिक मूल्यमापन या विभागांत विभागणी करण्यात आली आहे. स्वाध्यायातील विविध प्रश्नप्रकारांसोबत सरावासाठीचे मुबलक प्रश्न सुयोग्य उत्तरांसहित येथे देण्यात आले आहेत. आकारिक मूल्यमापनातील मौखिक कार्य, लेखी कार्य आणि उपक्रम/प्रकल्प हे विभाग विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणारे ठरतील, याची आम्हांला खात्री आहे.

याशिवाय, पाठ्यपुस्तकात आलेल्या व्याकरणिक संकल्पना स्पष्ट करण्यासाठी, त्यांच्या सरावावर अधिक भर देण्यासाठी एक स्वतंत्र व्याकरण विभाग देण्यात आला आहे; तर लेखन विभागात निबंधलेखन, पत्रलेखन व कथा यांचे काही नमुने व सरावासाठी प्रश्नही दिले आहेत. या पुस्तकाची विविध प्रकारची वैशिष्ट्ये पुढील पृष्ठावर विस्तारित स्वरूपात देण्यात आली आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेची गोडी वाढवण्यात आमचे हे पुस्तक यशस्वी ठरेल याची आम्हांला खात्री आहे.

हे पुस्तक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरता आपला अभिप्राय mail@targetpublications.org या इ-मेल पत्त्यावर पाठवावा, ही नम्र विनंती.

**कल्पक अभ्यासासाठी मुलांना खूप खूप शुभेच्छा !**

**प्रकाशक**

**आवृत्ती:** द्वितीय

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी बालभारती; चौथे पुनर्मुद्रण: २०२०' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# ठळक वैशिष्ट्ये

## पाठाचा परिचय

संपूर्ण पाठ एका दृष्टिक्षेपात समजावा याकरता संपूर्ण पाठाचा संक्षिप्त सार यात देण्यात आला आहे.

## कवितेचा भावार्थ

कविता समजण्यास सोपी व्हावी याकरता संपूर्ण कवितेचा भावार्थ सोप्या शब्दांत देण्यात आला आहे.

## शब्दार्थ/वाक्प्रचार व त्यांचे अर्थ

पाठ/कविता उत्तमप्रकारे समजण्याकरता त्यातील अवघड शब्दांचे व वाक्प्रचारांचे सोप्या मराठीत अर्थ देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या सोयीकरता वर्णमालेच्या क्रमानुसार त्यांची रचना करण्यात आली आहे.

## टिपा

पाठ/कविता चांगल्याप्रकारे समजण्याकरता त्यातील अवघड संकल्पना स्पष्ट करणाऱ्या टिपा वर्णमालेच्या क्रमानुसार देण्यात आल्या आहेत.

## संकलित व आकारिक मूल्यमापन

सर्व पाठ व कविता यांतील प्रश्नांचे CCE पॅटर्ननुसार संकलित व आकारिक मूल्यमापन असे विभाजन करण्यात आले आहे.

## स्वाध्यायातील प्रश्न

पाठाखालील / कवितेखालील सर्व प्रश्नांचा सुयोग्य उत्तरांसहित समावेश करण्यात आला आहे.

## उपक्रम/प्रकल्प

आवश्यक तेथे पाठातील / कवितेतील उपक्रमांची उत्तरे देण्यात आली आहेत.

## स्वतंत्र व्याकरण विभाग

स्वतंत्र व्याकरण विभागात शब्दजाती, काळ, लेखननियम व विरामचिन्हे या व्याकरण घटकांचा उदाहरणांसह आढावा घेण्यात आला असून सरावासाठी अधिकचे प्रश्न देण्यात आले आहेत.

## स्वतंत्र लेखन विभाग

निबंधलेखन, पत्रलेखन व कथालेखन या घटकांवर आधारित अनेक नमुना प्रश्न उत्तरांसह देण्यात आले आहेत. सरावासाठी प्रश्नांचाही समावेश केला आहे.

Sample Content

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | **भाग - १** | | |
| १. | बलसागर भारत होवो (गीत) | साने गुरुजी | १ |
| २. | सायकल म्हणते, मी आहे ना ! | - | ४ |
| ३. | डॉ. कलाम यांचे बालपण | डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम | १० |
| ४. | गवतफुला रे ! गवतफुला ! (कविता) | इंदिरा संत | १६ |
| ५. | बाकी वीस रुपयांचं काय? | बाबाराव मुसळे | २० |
| ६. | पण थोडा उशीर झाला... | संदीप हरी नाझरे | २६ |
| ७. | आपले परमवीर | - | ३२ |
| | **भाग - २** | | |
| ८. | माय (कविता) | स. ग. पाचपोळ | ३७ |
| ९. | वारली चित्रकला | डॉ. गोविंद गारे | ४३ |
| १०. | सुगंधी सृष्टी | ना. ग. गोरे | ४९ |
| ११. | माझ्या आज्यानं पंज्यानं (कविता) | शंकर अभिमान कसबे | ५६ |
| | भाषेचे नमुने: वऱ्हाडी बोली | पुरुषोत्तम बोरकर | ६० |
| | भाषेचे नमुने: मराठवाडी बोली | बालाजी मदन इंगळे | |
| १२. | मला मोठ्ठं व्हायचंय ! | प्रियंवदा करंडे | ६४ |
| १३. | आपली सुरक्षा, आपले उपाय ! | - | ६८ |
| | **भाग - ३** | | |
| १४. | आतां उजाडेल ! (कविता) | मंगेश पाडगांवकर | ७१ |
| १५. | बालसभा | - | ७६ |
| १६. | सफर मेट्रोची | क्रांती गोडबोले-पाटील | ८२ |
| १७. | दुखणं बोटभर | डॉ. चित्रा सोहनी | ८७ |
| १८. | बहुमोल जीवन (कविता) | रमण रणदिवे | ९३ |
| १९. | मले बाजाराला जायाचं बाई ! | प्रभा र. बैकर | ९७ |
| | **भाग - ४** | | |
| २०. | ओळख थोरांची: भाग - १, भाग - २ | संजय दुधाणे | १०३ |
| २१. | या काळाच्या भाळावरती (कविता) | उत्तम कोळगावकर | १०९ |
| २२. | वडिलांस पत्र | - | ११३ |
| २३. | परिवर्तन विचारांचे | - | ११९ |
| २४. | रोजनिशी | - | १२३ |
| २५. | नवा पैलू | प्रतिभा पानट | १२७ |
| २६. | संतवाणी: अंभग १ | संत बहिणाबाई | १३२ |
| | संतवाणी: अंभग २ | संत निर्मळा | |
| | संतवाणी: अंभग ३ | फादर थॉमस स्टीफन्स | |
| | **व्याकरण विभाग** | | १३४ |
| | **लेखन विभाग** | | १४५ |


टीप: पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.

Sample Content

# २ सायकल म्हणते, मी आहे ना!

## पाठाचा परिचय

'सायकल म्हणते, मी आहे ना!' हा एक आत्मकथनात्मक पाठ आहे. अबालवृद्धांना वापरण्यास सोपे व सहज वाटणारे वाहन म्हणजे सायकल. आरोग्य व पर्यावरणाच्या दृष्टीने हितकारक असलेली, कमी खर्चात मिळणारी व वापरण्यात सहजता असणारी हीच सायकल या पाठातून आपलीच माहिती स्वत: सांगत आहे.

## शब्दार्थ

| | |
|---|---|
| आडरस्ता | अधिक वर्दळ नसलेला सामसूम रस्ता |
| ऑफिस | कार्यालय |
| कार्यक्षम | अधिक क्षमतेने कार्य करणारे |
| चलन | पैसे |
| जन्मदाते | जन्म देणारे |
| तंदुरूस्त | स्वस्थ |
| दुखापत | इजा |
| दुचाकी | दोन चाकांवर चालणारे वाहन |
| माफक | यथायोग्य, बेताची |
| मेद | चरबी |
| लाभदायक | फायदेशीर, उपयुक्त |
| सुखद | सुख देणारे |
| संगत | साथ, सोबत |
| हमखास | नक्की, खात्रीने, जरूर |

## वाक्प्रचार व त्यांचे अर्थ

| | |
|---|---|
| धडा शिकणे. | नियम, शिस्त शिकणे. |
| धूम ठोकणे. | वेगाने पळून जाणे. |
| रखडत चालणे. | रेंगाळत चालणे. |
| स्वार होणे | आरुढ होणे, बसणे |
| हातभार लावणे. | मदत करणे. |

## टिपा

| | |
|---|---|
| चालक परवाना (लायसन) | कार, बाइक आणि अन्य सर्व मोठी वाहने चालवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयातून (आर. टी. ओ.) काढावी लागणारी परवानगी. |
| दंततबकडी | सायकलचे पेडल आणि मागील चाक यांवर साखळी बसवण्यासाठी लावलेले दातेरी चाक. |
| पेडल | सायकल चालवण्यासाठी पाय ठेवण्याचे साधन. |
| फ्रान्स, पॅरिस | फ्रान्स हा युरोपातील एक देश असून पॅरिस ही त्याची राजधानी आहे. |

## संकलित मूल्यमापन

## पाठाधारित प्रश्नोत्तरे

**प्र.१. कंसातील योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**
(वायू, फुप्फुसे, स्नायू, बळकट, माफकच)

i. घाम येईपर्यंत सायकल चालवल्याने तुमची ............... अधिक कार्यक्षम होतात. — **फुप्फुसे**

ii. घाम निघाल्याने जादा मेद जळून जातो व प्रतिकारशक्ती वाढते आणि तुमच्या पायांचे ............... बळकट होतात. — **स्नायू**

iii. माझी किंमत तशी ..............., त्यामुळे तुमचे पैसे वाचतात. — **माफकच**

iv. वाहनांची संख्या वाढली, की ............... प्रदूषण वाढते. — **वायू**

**प्र.२. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

**i. काही लोक सायकलला कोणत्या नावाने संबोधतात?**

**उत्तर:** काही लोक सायकलला 'दुचाकी' या नावाने संबोधतात.



Sample Content

**ii. लहान मुलांचे दुसरे वाहन कोणते?**

**उत्तर:** सायकल हे लहान मुलांचे दुसरे वाहन असते.

**iii. काय टाळण्यासाठी जगभर वाहतूक क्षेत्रात सायकलचा वापर होत आहे?**

**उत्तर:** प्रदूषण टाळण्यासाठी जगभर वाहतूक क्षेत्रात सायकलचा वापर होत आहे.

**प्र.३. चार-पाच वाक्यांत उत्तरे लिहा.**

(**टीप:** खालील प्रत्येक उत्तराच्या सुरुवातीस ही प्रस्तावना लिहिता येऊ शकते.

**प्रस्तावना:** हा आत्मकथनात्मक पाठ असून, यात सायकल स्वत:च आपली माहिती सांगते. पर्यावरण व आरोग्याच्या दृष्टीने सायकल कशी हितकारक आहे ते या पाठातून समजते.)

***i. मुले सायकलचा वापर कशाकशासाठी करतात?**

**उत्तर:** आईला दुकानातून साबण आणून देण्यासाठी मुले सायकलचा वापर करतात. तसेच, सायकलवर स्वार होऊन बाजारातून भाजीपाला, कधीकधी दूध, तर कधी आजोबांच्या गोळ्या आणून देण्यासाठीही सायकलचा वापर करतात. अशी छोटी-मोठी कामे करण्यासाठी मुलांना सायकलचा उपयोग होतो.

***ii. सायकल चालवणाऱ्याला वेगळा व्यायाम करण्याची गरज पडणार नाही, असे का म्हटले आहे?**

**उत्तर:** घाम येईपर्यंत सायकल चालवल्याने फुफ्फुसे अधिक कार्यक्षम होतात. मांसपेशी तंदुरुस्त राहतात. घाम निघाल्याने जादा मेद जळून जातो. प्रतिकारशक्ती वाढते आणि पायांचे स्नायू बळकट होतात. त्यामुळे, सायकल चालवणाऱ्याला वेगळा व्यायाम करण्याची गरज नाही, असे म्हटले आहे.

***iii. सायकलच्या रूपात कसा कसा बदल होत गेला?**

**उत्तर:** फ्रान्समधील एम्. डी. सिव्हर्क यांनी १६९० मध्ये सायकलचा शोध लावला. तिला अधिक गती यावी, म्हणून एच्. जे. लॉसन यांनी १८७६ साली पेडलला साखळीची दंत तबकडी बसवली. त्यानंतर १८८७ साली जॉन बॉइड डनलॉप यांनी रबरी टायरचा शोध लावला, हे टायर बसवल्याने सायकलला वेग आला. आता सायकल बरीच आधुनिक झाली असून तिला गिअरही लागले आहेत. शर्यतीसाठी आणि पर्यटनासाठी तिची वेगवेगळी बांधणी केली जाते. अशाप्रकारे, सायकलच्या रूपात बदल होत गेला.

**iv. प्रदूषण टाळण्यासाठी पर्याय म्हणून सायकल कशी उपयोगी ठरते?**

**उत्तर:** वाहनांची संख्या वाढली, की वायू प्रदूषण वाढते. वाहतूक कोंडी होते. मोठ्या शहरात ह्या समस्या जीवघेण्या ठरतात. सायकलला इंधन लागत नाही. त्यामुळे, तिच्यामुळे वायू प्रदूषण होत नाही. अशाप्रकारे, प्रदूषण टाळण्यासाठी पर्याय म्हणून सायकल उपयोगी ठरते.

***प्र.४. खालील आकृतीत दिलेल्या मुद्द्यांप्रमाणे सायकल चालवण्याचे फायदे लिहा.**

वैयक्तिक फायदे | सामाजिक फायदे | राष्ट्रीय फायदे

**उत्तर:**

**वैयक्तिक फायदे**
- व्यायाम होतो.
- किंमत माफक व दुरुस्तीचा फार खर्च येत नाही.
- पार्किंग करणे सहज शक्य होते.

**सामाजिक फायदे**
- अपघातांचे प्रमाण कमी होते.
- वायू प्रदूषण होत नाही.
- वाहतूक कोंडी टाळता येते.

**राष्ट्रीय फायदे**
- परदेशातून इंधन विकत आणावे लागणार नाही.
- चलन वाचेल.
- पेट्रोल, डिझेल या इंधनांची बचत होईल.

Sample Content

## भाषाभ्यास व व्याकरण

***प्र.१. खालील शब्दांचे अर्थ समजून घ्या.**

i. प्रचार व प्रसार ii. विश्वास व आत्मविश्वास

**उत्तर:** i: **प्रचार** म्हणजे एखादी गोष्ट वारंवार सांगून जाणीवपूर्वक पटवून देणे. यामध्ये लोकांचे मन वळवण्याचा किंवा त्यांना आपल्या मताशी सहमत करण्याचा प्रयत्न केला जातो. (उदा. निवडणुकीचा प्रचार).

एखादी गोष्ट पसरवणे म्हणजे **प्रसार**. प्रसारमाध्यमांद्वारे अनेक गोष्टींचा प्रसार केला जातो.

ii: **विश्वास** म्हणजे खात्री किंवा निश्चिती. अनेक सकारात्मक गोष्टींवर आणि व्यक्तींवर आपण विश्वास ठेवतो. **आत्मविश्वास** म्हणजे स्वत:चा स्वत:वर असलेला विश्वास. आपल्याला आपल्या क्षमतांची जाणीव होते, तेव्हा आत्मविश्वास येतो.

***प्र.२. हलकीफुलकी म्हणजे खूप हलकी, तसे खालील शब्दांचे अर्थ लिहा.**

i. कधीमधी ii. अवतीभवती iii. धामधूम iv. फेरफटका v. साधेसुधे

**उत्तर:** i. कधीमधी – कधीतरी किंवा कधीकधी. ii. अवतीभवती – आपल्या आजूबाजूच्या परिसरात, सभोवताली.
iii. धामधूम – धावपळ, गडबड, जल्लोष. iv. फेरफटका – जवळच्या अंतरावर फिरणे, भटकणे.
v. साधेसुधे – खूप साधे.

***प्र.३. 'आडरस्ता' यासारखे आणखी शब्द लिहा.**

**उत्तर:** i. आडमार्ग ii. आडवाट iii. आडगाव iv. आडवस्ती
v. आडनाव vi. आडवळण vii. आडबाजू

**प्र.४. समानार्थी शब्द लिहा.**

i. संगत = ii. कायम = iii. गरज = iv. अवघड =
v. बळकट = vi. अडचण = vii. लाभ = viii. वायू =

**उत्तर:** i. साथ, सोबत ii. नेहमी, सतत iii. आवश्यकता iv. कठीण, बिकट
v. मजबूत vi. समस्या vii. नफा, फायदा viii. वारा, पवन, वात.

**प्र.५. विरुद्धार्थी शब्द लिहा.**

i. सुखद × ii. कार्यक्षम × iii. बळकट × iv. दुरुस्त ×
v. विकत × vi. परदेश × vii. सावध × viii. आवड ×

**उत्तर:** i. दु:खद ii. अकार्यक्षम iii. कमकुवत iv. नादुरुस्त
v. फुकट, मोफत vi. स्वदेश vii. बेसावध viii. नावड

**प्र.६. दिलेल्या शब्दांत लपलेले शब्द शोधा.**

i. दंततबकडी ii. लाभदायक

**उत्तर:** i. दंत, तबक, बक, कडी, तबकडी, तडीत. ii. लाभ, लायक, भला, भय, कला.

**प्र.७. खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा.**

*i. रखडत चालणे *ii. धडा शिकणे *iii. हातभार लावणे iv. धूम ठोकणे v. स्वार होणे

**उत्तर:** i. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे गाडी **रखडत चालली** होती.

ii. परीक्षेला पोहोचायला उशीर झाल्याने मी लवकर उठण्याचा **धडा शिकलो.**

iii. घरातील सर्व सदस्यांनी घरकामांना **हातभार लावला,** तर आईचे काम हलके होईल.

iv. शाळा सुटताच मुलांनी घराकडे **धूम ठोकली.**

v. मामाकडे चल म्हणताच राघवची स्वारी दुचाकीवर **स्वार झाली.**

Sample Content

**प्र.८. खालील वाक्यांत सहा नामे आली आहेत. ती लिहा.**

*i. माधव आणि सरिता रस्त्याने खोडकरपणा न करता शाळेतून घरी परतले.

**उत्तर:** माधव | सरिता | रस्ता | खोडकरपणा | शाळा | घर

ii. आफ्रिका खंडातील सहारा हे पृथ्वीवरील सर्वांत मोठे आणि सर्वाधिक उष्णता असलेले वाळवंट आहे.

**उत्तर:** आफ्रिका | खंड | सहारा | पृथ्वी | उष्णता | वाळवंट

***प्र.९. खालील यादी पूर्ण करा.**

i. व्यक्तींची नावे : .............   ii. गावांची नावे : .............

iii. नद्यांची नावे : .............   iv. पर्वतांची नावे : .............

**उत्तर:** i. व्यक्तींची नावे : पूजा, मानस, रवींद्र, प्रभाकर.

ii. गावांची नावे : रामपूर, देवगड, पळस्पे, महाड, मोखाडा, कोल्हापूर.

iii नद्यांची नावे : उल्हास, सावित्री, वासिष्ठी, तापी, पूर्णा, गोदावरी, नर्मदा, कृष्णा, कावेरी, भीमा, प्रवरा, इंद्रायणी.

iv. पर्वतांची नावे : सह्याद्री, गिरनार, विंध्य, सातपुडा, माऊंट आबू, मलयगिरी, हिमालय.

***प्र.१०.खालील नामांचे दिलेल्या सारणीमध्ये योग्य वर्गीकरण करा.**

सतलज, बाग, कविता, लाडू, आंबेगाव, शाळा, कीटक, झेंडा, लाकूड, प्राजक्ता, मराठी, आई, कापड, बंडू, सह्याद्री.

**उत्तर:**

| | |
|---|---|
| **सामान्यनाम** | बाग, लाडू, शाळा, कीटक, झेंडा, लाकूड, आई, कापड. |
| **विशेषनाम** | सतलज, कविता, आंबेगाव, प्राजक्ता, मराठी, बंडू, सह्याद्री. |

**प्र.११. खालील वाक्यांमधील भाववाचक नामे शोधून लिहा.**

i. प्रामाणिकपणामुळे आपण लोकांचा विश्वास संपादन करू शकतो.

ii. रुग्णालयामध्ये शांतता राखणे आवश्यक आहे.

iii. पैशाच्या श्रीमंतीपेक्षा मनाची श्रीमंती नेहमीच मोठी असते.

iv. गुलाबाच्या फुलांचे सौंदर्य सर्वांनाच मोहित करते.

**उत्तर:** i. प्रामाणिकपणा   ii. शांतता   iii. श्रीमंती   iv. सौंदर्य

**प्र.१२. खालील वाक्यांमध्ये योग्य विरामचिन्हे द्या.**

**i. राजू विजय सीमा शाम आणि सरिता दररोज शाळेत जातात**

**उत्तर:** राजू, विजय, सीमा, शाम आणि सरिता दररोज शाळेत जातात.

**ii. आजोबा म्हणाले जा दुकानातून माझी औषधं घेऊन ये**

**उत्तर:** आजोबा म्हणाले, “जा, दुकानातून माझी औषधं घेऊन ये.”

## आकारिक मूल्यमापन

### मौखिक कार्य

***प्र.१. पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.६ वरील उतारा वाचा. त्यातील घटना क्रमाने सांगा.**

### लेखी कार्य

***प्र.१. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

**i. आठवड्यातून एक दिवस स्वत:चे वाहन न वापरता, सार्वजनिक वाहनानेच प्रवास करायचा असे सर्वांनी ठरवले, तर कोणकोणते फायदे होतील?**

**उत्तर:** आठवड्यातून एक दिवस स्वत:चे वाहन न वापरता, सार्वजनिक वाहनानेच प्रवास करायचा असे सर्वांनी ठरवले, तर रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी कमी होईल, त्यामुळे ध्वनी प्रदूषण आणि वायू प्रदूषणही कमी होईल. इंधनाची बचत झाल्याने आपले पैसे वाचतील. त्याचबरोबर पेट्रोल, डिझेल खरेदीसाठी परदेशात जाणारे आपले चलनही काही प्रमाणात वाचवता येईल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला नफा होईल. त्या दिवसापुरता तरी पार्किंगचा प्रश्न निर्माण होणार नाही. त्याचबरोबर वाहन चालवण्याचे आपले कष्ट वाचतील.

Sample Content

**ii. तुमच्या कुटुंबातील, परिसरातील व्यक्तींनी सायकलचा वापर करावा यासाठी तुम्ही कोणकोणते प्रयत्न कराल?**

**उत्तर:** सायकलच्या वापरामुळे आरोग्याच्या दृष्टीने होणारे फायदे मी त्यांना समजावून सांगेन. इंधन वाचल्यामुळे आपले पैसे वाचतील तसेच, वाहनांतून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे होणारे प्रदूषण टाळता येईल, हे पटवून देईन. सायकल वापरल्याने वाहतूक कोंडी, पार्किंगच्या जागेची समस्या आणि अपघात या प्रश्नांवरही मात करता येईल, हेदेखील मी समजावून सांगेन. 'सायकल म्हणते, मी आहे ना!' या पाठाच्या आधारे भित्तिपत्रक तयार करून परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी चिकटवेन, ते वाचून लोक सायकलचा वापर करण्यास प्रवृत्त होतील. सोसायटीच्या कार्यक्रमांमध्ये तसेच, गणेशोत्सवातील कार्यक्रमांमध्ये मित्रांच्या मदतीने 'सायकलचे उपयोग' या विषयावरील पथनाट्य सादर करेन.

***प्र.२. सायकल व मोटारसायकल यांचा संवाद आठ ते दहा ओळींत लिहा.**

**उत्तर:** (सायकल रस्त्याने व्यवस्थित चालली आहे, तेवढ्यात समोरून एक मोटारसायकल वेगाने तिच्या अंगावर येते.)

**सायकल** : ए, हळू चाल ना थोडी! एवढी काय घाई आहे गं तुला? चेंगरले असते ना मी आता.

**मोटारसायकल** : एक नंबरची घाबरट आहेस तू! एवढी भीती वाटते, तर येतेस कशाला आमच्या रस्त्यावर?

**सायकल** : किती गं तोरा तुला? तू आता कानामागून येऊन तिखट झालीस. तुझ्याआधी मीच घेऊन जायचे माणसांना इकडून-तिकडे. हं, पण आता ही माणसंच मला विसरली आणि माझ्यावर अशी एकटं पडायची वेळ आली. तरी बरं लहान मुलांना अजूनही मी आवडते. चालक परवाना मिळेपर्यंत का होईना, चालवतात मला.

**मोटारसायकल** : मग, आहेच मी स्मार्ट आणि वेगवान!

**सायकल** : हो गं बाई! आहेस तू माझ्याहून वेगवान! पण तुला चालायला इंधन लागतं. माझ्या चाकांमध्ये एकदा हवा भरली की बस्स, मी अगदी तयार असते कुठेही जायला. तुझ्यामुळे प्रदूषण होतं, अपघात होतात. तुझी किंमतही जास्त, दुरुस्तीचा खर्चही जास्त, त्याचं काय?

**मोटारसायकल** : (नि:श्वास सोडून) हे मात्र अगदी खरं बोललीस तू. इंधन नसेल, तर मी अगदी बिनकामाची होऊन जाते. शिवाय प्रदूषणही होतं माझ्यामुळे हे पण खरंच आहे; पण तातडीच्या प्रसंगी आणि दूरच्या अंतरावर वेगाने प्रवास करायला मीच उपयोगी पडते ना!


**सायकल** : हो गं हो! बरोबर आहे तुझं, तातडीच्या प्रसंगी, दूरच्या अंतरावर तूच खरी उपयोगी पडतेस. मी तर फार हळूबाई आहे, इच्छा असूनही मी लोकांना वेगानं नाही नेऊ शकत.

**मोटारसायकल** : अगं, आपण दोघीही आपापल्या जागी बरोबर आहोत. तुझ्यामुळे लोकांचा व्यायाम होतो, प्रदूषण होत नाही, अपघात टळतात आणि मी लोकांचा वेळ वाचवते, दूरच्या ठिकाणी त्यांना वेगाने पोहोचवते.

**सायकल** : खरं आहे तुझं; पण तूसुद्धा फार वेगानं नको जाऊस. वाहतुकीच्या नियमांचे पालन कर. शेवटी माणसांना सुरक्षित पोहोचवण्याची जबाबदारी आपल्यावर असते, हे लक्षात ठेव!

**मोटारसायकल** : हो गं, नक्की लक्षात ठेवेन. मी खूप आभारी आहे तुझी. आज तुझ्यामुळे माझे डोळे उघडले.

***प्र.३. सायकलचे निरीक्षण करा व तिच्या भागांची नावे लिहा.**



**उत्तर:** हँडल, पेडल, सीट, स्टँड, घंटी, हेडलाईट, टायर, ट्यूब, ब्रेक, गिअर ही सायकलच्या भागांची नावे आहेत.

***प्र.४. सायकल शिकताना तुम्हांला आलेले अनुभव आठ ते दहा वाक्यांत लिहा.**

**उत्तर:** गेल्या वर्षी आईने मला सायकल चालवायला शिकवले. सुरुवातीला सायकलचे वजन मला झेपते, की नाही हे पाहण्यासाठी ती मला सायकल नुसती हातात धरून फिरवायला सांगत असे. त्यानंतर तिने मला एक पाय पेडलवर आणि दुसरा पाय जमिनीवर

Sample Content




ठेऊन हळूहळू तोल सावरायला शिकवले. तोल सांभाळत पुढे जाताना मला खूप मजा येत होती. धाडस करून मी सायकलवर स्वार झाले आणि मग सायकल चालवता आल्याच्या आनंदात वेगाने पुढे जाऊ लागले; पण ब्रेक कसा लावायचा हे नीटसे माहीत नव्हते. रस्त्यावरचा मोठा खड्डा चुकवता न आल्याने माझी सायकल थेट खड्ड्यात पडली. माझ्या हाताला-पायाला खरचटले होते; पण सायकल चालवता आल्याच्या आनंदात माझे दुखणे कुठल्याकुठे पळून गेले. खरचटल्याच्या जखमा बऱ्या झाल्यावर मी पुन्हा एकदा उत्साहाने सायकलवर स्वार झाले. ब्रेक, रस्त्यावरील खड्डे, चालणारी माणसे, गाड्या यांचा नीट अंदाज घेऊन आत्मविश्वासाने सायकल चालवू लागले. त्या दिवसापासून सायकल माझी मैत्रीण झाली.




***प्र.५. संगणक तुमच्याशी बोलू लागला तर.... कल्पना करा व लिहा.**




**उत्तर:** नमस्कार मित्रांनो, मी संगणक बोलतोय! माहिती शोधण्यासाठी, विविध खेळ खेळण्यासाठी मी तुम्हांला नेहमी मदत करतो. अचूकता, कामाचा अतिप्रचंड वेग, न कंटाळता व न थकता अचूक काम करण्याची क्षमता, सातत्य आणि विश्वासार्हता ही माझी वैशिष्ट्ये आहेत. मित्रांनो, माझ्या मदतीने तुम्ही जगातील कोणतीही माहिती क्षणार्धात शोधू शकता. मी तुम्हांला नेहमीच मदत करत राहीन; पण त्यासाठी तुम्ही माझी नीट काळजीसुद्धा घेतली पाहिजे. इंटरनेटच्या माध्यमातून कधीकधी व्हायरसच्या हल्ल्यामुळे माझ्यामध्ये बिघाड होऊ शकतो. त्यामुळे इंटरनेटचा वापर करताना माझ्या सिस्टिममध्ये अँटिव्हायरस टाकायला विसरू नका. अजून एक सांगतो मित्रांनो, तुम्ही माझा उपयोग अभ्यासापेक्षा गेम खेळण्यासाठीच जास्त करता. अधिक वेळ गेम खेळल्यामुळे तुमचे डोळे खराब होऊ शकतात, म्हणून गेम खेळण्यासाठी माझा वापर थोडा वेळच करा. हे माहिती तंत्रज्ञानाचं युग आहे, त्यामुळे माझा वापर करून अधिकाधिक ज्ञानाचा खजिना मिळवा आणि हुशार व्हा. मी तुमचा खरा मित्र आहे. मग ऐकाल ना, तुमच्या या मित्राचा सल्ला!

**प्र.६. खालील चित्रे पाहा. ज्या वाहनांनी तुम्ही प्रवास केला आहे, त्यापुढे दिलेल्या चौकटीत ✓ अशी खूण करा.**

(पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. २)

 ☐  ☐  ☐

 ☐  ☐  ☐

 ☐  ☐  ☐

(**टीप:** हा प्रश्न विद्यार्थ्यांनी स्वत: सोडवावा.)

## उपक्रम / प्रकल्प

***प्र.१. तुमच्या गावातील सायकल दुरुस्ती करणाऱ्या व्यक्तीची भेट घ्या. सायकल दुरुस्तीच्या विविध कामांबाबत त्या व्यक्तीकडून माहिती मिळवा.**

**प्र.२. सायकलचे विविध उपयोग या विषयावर भित्तिपत्रक तयार करून शाळेच्या नोटीस बोर्डवर लावा.**

(**टीप:** हे उपक्रम/प्रकल्प विद्यार्थ्यांनी स्वत: करावेत.)

Sample Content

## AVAILABLE BOOKS FOR STD. VI:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

**NOTES**
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

**NOTES**
- My English Book
- मराठी बालभारती
- हिंदी सुलभभारती
- इतिहास व नागरिकशास्त्र
- भूगोल
- सामान्य विज्ञान
- गणित

**WORKBOOK**
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics




Also Available
Hindi Grammar & Writing Skills Books
For Std 6th & 7th

## AVAILABLE BOOKS FOR STD. VII:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

**NOTES**
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

**NOTES**
- My English Book
- मराठी बालभारती
- हिंदी सुलभभारती
- इतिहास व नागरिकशास्त्र
- भूगोल
- सामान्य विज्ञान
- गणित

**WORKBOOK**
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics


### OUR PRODUCT RANGE

Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery

Visit Our Website

**Target Publications® Pvt. Ltd.**
*Transforming lives through learning.*


**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080
**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org


Explore our range of STATIONERY